# महाराष्ट्र अराजपत्रित सेवा मुख्य परीक्षा (गट ब)
# Maharashtra Non Gazzeted Services Main Examination (Group B)

## -: परीक्षा योजना :-

**प्रश्नपत्रिकांची संख्या - दोन**

**पेपर क्र.-१ - २०० गुण**
**पेपर क्र.-२ - २०० गुण**
**एकूण - ४०० गुण**

**शारीरिक चाचणी व मुलाखत - केवळ पोलीस उप निरीक्षक पदाकरीता**
**(शारीरिक चाचणी - १०० गुण, मुलाखत - ४० गुण)**

| पेपर क्र. व संकेतांक | विषय | प्रश्नसंख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ (सांकेतांक १०६२) | मराठी | ५० | १०० | बारावी | मराठी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | इंग्रजी | ५० | १०० | पदवी | इंग्रजी | | |
| २ (सांकेतांक १०६३) | सामान्य अध्ययन व बुद्धिमत्ता चाचणी | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**नकारात्मक गुणदान -**

| |
|---|
| १) प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/ कमी करण्यात येतील. |
| २) एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा अधिक उत्तरे दिली असल्यास अथवा ज्या उमेदवाराने उत्तरपत्रिकेत पूर्ण वर्तुळ चिन्हांकित केले नसेल अशा प्रश्नाचे उत्तर चुकीचे समजण्यात येऊन त्या प्रश्नाच्या उत्तराकरीता २५% किंवा १/४ एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील. |
| ३) वरीलप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करताना एकूण अंतिम गुणांची बेरीज अपूर्णांकात आली तरीही ती अपूर्णांकातच राहील व पुढील कार्यवाही त्याच्या आधारे करण्यात येईल. |
| ४) एखाद्या प्रश्नाचे उत्तर अनुत्तरितअसेल तर, अशा प्रकरणी नकारात्मक गुणांची पध्दत लागू असणार नाही. |

## -: अभ्यासक्रम :-

**पेपर क्रमांक - १ - मराठी, इंग्रजी या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | **मराठी** :- सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उतार्‍यावरील प्रश्नांची उत्तरे |
| २ | **इंग्रजी** : - Common Vocabulary, Sentence structure, Grammar, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |

**पेपर क्रमांक -२ - सामान्य क्षमता चाचणी या विषयामध्ये खालील घटक/ उपघटकांचा समावेश असेल.**

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १. | **सामान्य बुद्धिमापन व आकलन** - उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो हे आजमावण्यासाठी प्रश्न |
| २. | **चालू घडामोडी** - जागतिक तसेच महाराष्ट्रासह भारतातील. |
| ३. | **अंकगणित व सांख्यिकी** |
| ४. | **माहितीचा अधिकार अधिनियम २००५ (as updated) व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५** |

The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16
9665666195 / 9665288834
THE OFFICER Your Personal Mentor
We have been Recognised By...

| | |
|---|---|
| ५. | **भारतीय संघ राज्यव्यवस्था, भारतीय राज्यघटना, स्थानिक स्वराज्य संस्था, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ व विधीमंडळ इत्यादी**<br>घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ - कर्तव्ये, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व कर्तव्ये, विधी समित्या इत्यादी |
| ६. | **आधुनिक भारताचा विशेषत: महाराष्ट्राचा इतिहास** - सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे कार्य, समाज सुधारकांचे कार्य, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे, शिक्षणाचा परिणाम, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी |
| ७. | **भारताचा व महाराष्ट्राचा भूगोल** - महाराष्ट्राचा व भारताचा प्राकृतिक (Physical) भूगोल, मुख्य प्राकृतिक (Physiographic) विभाग, हवामान शास्त्र (Climate), पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व पठार, विविध भुरूपे, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, लोकसंख्येचे स्थानांतर (Migration of Population) व त्याचे उगम (Source) आणि इष्टस्थानावरील (Destination) परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्ट्या व त्यांचे प्रश्न. |
| | **पर्यावरण** - मानवी विकास व पर्यावरण, पर्यावरणपूरक विकास, नैसर्गिक साधनसंपत्तीचे संधारण विशेषत: वनसंधारण, विविध प्रकारची प्रदूषणे व पर्यावरणीय आपत्ती, पर्यावरण संवर्धनात कार्यरत असलेल्या राज्य / राष्ट्र/ जागतिक पातळीवरील संघटना / संस्था इत्यादी. |
| ८. | **सामान्य विज्ञान व तंत्रज्ञान** —<br>**अ)** भौतिकशास्त्र (Physics), **ब)** रसायनशास्त्र (Chemistry),<br>**क)** प्राणीशास्त्र (Zoology), **ड)** वनस्पतीशास्त्र (Botany)<br>**इ)** दूर संवेदन, हवाई व ड्रोन छायाचित्रण, भौगोलिक माहिती प्रणाली व त्याचे उपयोजन (Remote Sensing, Aerial and drone photography, Geographic Information System (GIS) and it's application etc.)<br>**फ)** माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (Information and communication technology.) |
| ९. | **अर्थव्यवस्था व नियोजन, विकास विषयक अर्थशास्त्र**<br>**१ समग्रलक्षी अर्थशास्त्र**<br>१.१ समग्रलक्षी अर्थशास्त्र<br>१.२ वृद्धी आणि विकास<br>१.३ सार्वजनिक वित्त<br>१.४आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आंतरराष्ट्रीय भांडवल<br>**२ भारतीय अर्थव्यवस्था**<br>२.१ भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय अर्थव्यवस्थेची आव्हाने व आर्थिक सुधारणा<br>२.२ भारतीय शेती व ग्रामीण विकास<br>२.३ सहकार<br>२.४ मौद्रिक व वित्तीय क्षेत्र<br>२.५ सार्वजनिक वित्त आणि वित्तीय संस्था<br>२.६ उद्योग व सेवा क्षेत्र<br>२.७ पायाभूत सुविधा विकास<br>२.८ आंतरराष्ट्रीय व्यापार आणि भांडवल<br>२.९ महाराष्ट्राची अर्थव्यवस्था |

**दिनांक - ५ डिसेंबर, २०२२**

**सचिव**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16
9665666195 / 9665288834
THE OFFICER Your Personal Mentor
We have been Recognised By...